Pudhari 11/03/2021

# मुकुल माधव फाऊंडेशन नागा महिला वसतिगृहाला मासिक किराणा पुरवणार



रत्नागिरी : रेणुका माता वसतिगृहातील कार्यक्रमप्रसंगी मान्यवर.

**रत्नागिरी : पुढारी वृत्तसेवा**

मुकुल माधव फाऊंडेशन व फिनोलेक्स कंपनीकडून मणिपूर आणि नागालँडमधील १८ मुलींसाठी किराणा मालाचा खर्च उचलला आहे. चिपळूण येथे रेणुका माता नागा वसतिगृहात हा कार्यक्रम झाला.

रत्नागिरीतील चिपळूण तालुक्यात रेणुका माता नागा लेडीज वसतिगृह असून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समिती हा प्रकल्प चालवत आहेत. यामध्ये भारताच्या ईशान्येकडील भागातील मुलींना चिपळूण येथे आणून त्यांना या प्रकल्पांतर्गत शिक्षण, वसतिगृह, भोजन यांची सोय केली जाते. याचा उद्देश त्या भागातील धर्मांतर, स्थानिक संस्कृती आणि आदिवासींच्या कलांच्या संरक्षणासाठी स्थापन करण्यात आला आहे. मुकुल माधव फाऊंडेशन व फिनोलेक्स कंपनीकडून या प्रकल्पांतर्गत १८ मुलीसाठीचा किराणा खर्च उचलला आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन ९ मार्च रोजी श्रीमती, सुरेखा खेराडे, नगराध्यक्ष चिपळूण आणि डॉ. ज्योती यादव, तालुका आरोग्य अधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले.